B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue

ISSN : 2278-9308
March 2020

# सामाजिक सुधारणावादी विचारवंत — राजा राममोहन रॉय

प्रा. व्ही.जी. वसु
इतिहास विभागप्रमुख,डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय,पातूर, जि. अकोला

प्रस्तावना :—

राजा राममोहन रॉय यांचा जन्म 22 मे 1772 रोजी बंगाल मध्ये हुगळी जिल्हयातील राधानगर या गावी एका अत्यंत सनातनी कुटूंबात झाला. राममोहन रॉय यांचे प्राथमिक शिक्षण गुरूकुलात झाले. त्याच वेळी एका मौलवीच्या हाताखाली त्यांनी फारशी भाषेचेही धडे घेतले. त्याचप्रमाणे कुराणाचा व इस्लाम धर्माचाही त्यांनी बारकाईने अभ्यास केला. हिंदू धर्मामध्ये फोफावलेल्या अंधश्रध्दांची, मुर्तीपूजेची व अनेकेश्वरवादाची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली व चिडही आली व त्यांनी टिका करणारा एक निबंध लिहिला. म्हणून वडिलांनी त्यांना घराबाहेर घालवले. तेंव्हापासून राममोहन रॉय यांनी अखंड भ्रमंती करून हिंदू धर्माचा व तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. आणि त्यातून कट्टर सनातनी हिंदूत्वाला दोषमुक्त करण्यासाठी कटिबध्द होण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. हिंदू समाजातील मध्ययूगीन प्रवृत्तीशी आयुष्यभर लढा दिला.

सामाजिक सुधारणा :—

सामाजिक दोष दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे समाजात बुध्दीप्रामाण्य विकास होणे हा आहे तशी त्यांची खात्री होती. धार्मिक विचारांच्या कांती पासून सामाजिक—राजकीय प्रगतीची दिशा या समाजाला मिळू शकते हे ही त्यांना कळून चूकले त्यामुळे त्यांनी धर्माचा त्याग कधीच केला नाही. मानवी बुध्दी, उच्च दर्जाचे विश्लेषण, शास्त्रीय स्वरूपाची ज्ञान साधना इत्यादीच्या जोरावर हिंदू धर्मावर साठलेले पूटे नाहिशी करता येतील असे त्यांना वाटत असे. ज्ञान साधना आणि कार्य क्षमता यांचा साहाय्याने त्यांनी हे साध्य केले.

भारतीय जनतेला राजकीयदृष्टया जागृत करण्यासाठी पाश्चात्यांचे ज्ञान विज्ञान भारतात यावे म्हणून इंग्रजी शिक्षणाचे त्यांनी जोरदार समर्थन केले. तसेच जुन्या रुढी, दृष्ट अन्यायी प्रथा नष्ट करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. संती प्रथेला कायदयाने मान्यता रद्द करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. म्हणून विश्वातील मानवतावादी सुधारकांमध्ये राममोहन रॉय यांचे स्थान महत्वाचे आहे.

वृत्तपत्रांना स्वातंत्र्य असावे म्हणून ते स्वातंत्र्य बंगाली वृत्तपत्र "संवाद कौमुदीचे" संपादक होते. याशिवाय "बंगाल हेरॉल्ड" हया नावाचे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. त्यांच्या प्रयत्नास यश येऊन पुढे 1835 मध्ये वृत्तपत्रांना स्वातंत्र्य मिळाले.

राममोहन यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ धर्माला चिकटलेली बांडगुळे छाटण्यापासून केला. हिंदूंच्या भ्रष्ट चालीरीती, धर्माधिष्टीत पाशवी रूढी व भारतीय मताची झालेली कूपमंडूक वृत्ती यांच्यावर हल्ले चढविण्यातून केली. आपल्याकडे ग्रंथ प्रामाण्याच्या युगांविरूध्द बंड करण्याचा मान आधुनिक काळात राजा राममोहन रॉय यांना द्यावा लागेल. त्यांनी धर्म सुधारणा करीत असतांना वेदांत ग्रंथाचा आधार घेतला असला तरी ते वेदांना किंवा कोणत्याच ग्रंथांना ईश्वर निर्मित मानीत नव्हते पण हे सारे करीत असतांना रॉय यांचे ध्येय केवळ धर्म सुधारणेपूरतेच मर्यादित नव्हते. तो त्यांच्या मते केवळ पाया होता. सामाजिक आणि राजकीय प्रगतीच्या उभारणीचा अपेक्षीत बदल धार्मिक व सामाजिक क्षेत्रात घडून आले तर या त्यांच्या राजकीय विकसनाला फार मोठी चालना मिळेल अशी त्यांची ठाम खात्री होती म्हणून इ. स. 1828 मध्ये ते लिहितात, "हिंदूंनी आज अंगीकारलेली धर्मव्यवस्था ही त्यांच्या राजकीय हिताच्या दृष्टीने मुळीच अनुकूल नाही याचा मला विलक्षण खेद होतो." राजकीय सुधारणा व सामाजिक सौख्य आणि धर्म यांच्यातील परस्परपूरकता व परस्परावलंबन रॉय यांनी पक्के ओळखले होते हेच यावरून दिसून येते.

ISSN : 2278-9308
March 2020

**धार्मिक स्वातंत्र्य :–**

राजा राममोहन रॉय धार्मिक सहिष्णूतेचे पुरस्कर्ते होते. ते स्वतः विश्व धर्माचे उपासक होते पण सर्वांनाच या धर्माचे अनुमयित्व स्विकारणे तात्काळ जमेल असे त्यांना वाटले नाही. त्यामुळे ज्याला त्याला स्वतःच्या पसंतीच्या धर्माचा अवलंब करण्याचे स्वातंत्र्य असावे अशा मताचे ते होते. राज्यसंस्थेने प्रजाजनाच्या धार्मिक बाबीमध्ये हस्तक्षेप करू नये असे त्यांना वाटत असे. ब्रिटीश राज्यकर्त्यांचेही तेच धोरण असल्यामुळे रॉय यांनी त्याचे स्वागत केले. पूर्वीच्या सर्व जेत्यांनी पराजित धर्माचा उपहास केला, त्यांची टर उडविली आणि आपला धर्म त्यांच्यावर जुलूमाने लादण्याचा प्रयत्न केला. इंग्रज राज्यकर्ते त्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांचे अनुकरण करणार नाहीत अशी राममोहन रॉय यांची अपेक्षा होती.

**ब्रम्हो समाजाची स्थापना :–**

हिंदू धर्माच्या पूररुजिवनाच्या उद्देशाने स्थापन झालेल्या ब्रम्हो समाजही भारतातील आद्य संस्था होय. ख्रिश्चन मिशन–यांनी हिंदू धर्मा विरूध्द चालविलेल्या खोडसाळ अपप्रचारांना भोळ्या भाबड्या हिंदूंनी बळी पडू नये म्हणून हिंदू धर्माच्या रक्षणार्थ इ.स. 1828 मध्ये राममोहन रॉय यांनी ब्रम्हो समाजाची स्थापना केली.

सर्व धर्माच्या लोकांनी अध्यपनातून त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. ईश्वर एकच आहे म्हणून त्यांनी विश्वबंधुत्वाचा प्रसार केला. मात्र मुर्तीपूजा त्यांना मान्य नव्हती. बहुपत्नीत्वाला त्यांनी विरोध केला. अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती. सती प्रथेला कायदयाव्दारे त्यांनी विरोध केला.. स्त्रि शिक्षणाचा पुरस्कार केला. हे सर्व कार्य त्यांनी ब्रम्हो समाजाव्दारे सुरू केले.

धर्म, समाज व शिक्षण या विविध क्षेत्रात राममोहन रॉय यांनी भारताला नवी दिशा दाखवून दिली. म्हणून त्यांना ''नव्या यूगाचे अग्रेसर'' असे म्हटले जाते.

एकीकडे इंग्रजी साम्राज्याचे गोडवे गात असतांना दूसरीकडे भारताला स्वातंत्र्य का गमवावे लागले याची अंतर्मुख होऊन कारणमिमांसा राममोहन रॉय यांनी केली. त्यांनी सांगितले आहे की तत्कालिन राज्यकर्त्यांच्या आपसाती.। यादवीमुळे व नाकर्तेपणामुळे, प्रगत यूध्द तंत्राचा व शास्त्रांच्या अज्ञानामुळे, देशात राष्ट्रभक्तीच्या असलेल्या अभावामुळे, धार्मिक व सभ्यता विषयक अतिरेकीपणामुळे, त्याचप्रमाणे जातीप्रथेच्या संकूचीत बंधनांनी सामाजिक विदीर्ण झाल्यामुळे या देशाच्या स्वातंत्र्याचे अपहरण झाले व इंग्रज या देशात साम्राज्य प्रभावीत करू शकले. स्वातंत्र्य अपहरणाचे हे निदान केल्यानंतर त्यासंबंधी उपाययोजना करण्यात त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले.

**मूल्यमापन :–**

भारतीय प्रबोधनाचे प्रतिक विश्वधर्माचा प्रवर्तक, वृत्तपत्र व्यवसायाचा मुक्तीदाता पूर्वपश्चिमेला व भुत भविष्याला जोडणारे सेतू, मानवतेचा पूजारी अशा कित्येक विशेषणांनी राजा राममोहन रॉय हे नाव आधुनिक भारताच्या इतिहासात अजरामर ठरले आहे. रॉय यांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय विचारांना व्यापून टाकणा–या मानवता प्रेमामुळे व अमर्याद सहिष्णूतेच्या प्रेरणेमुळे त्यांचा संपूर्ण वैचारीक स्तरावर असंख्या सुसंगती व निश्चित तत्वज्ञानाची दृढ बैठक आढळून येते.

राजेंद्रनाथ टागोरांच्या शब्दात या प्रकरणाचा समारोप करणे अत्यंत औचित्यपूर्ण ठरेल असे वाटते ''रॉय यांनी भारतात आधुनिक युगाचा प्रारंभ केला हा देश सत्वाची जाणीव विसरला होता आणि त्यामुळे अतार्किकतेचे ओझे त्याच्या शिरावर येऊन पडले होते. परिस्थितीने तो गुलाम बनला होता. सामाजिक चालीरीती, राजकारण, धर्म व कला या सर्व क्षेत्रात जुन्या परंपरेच्या वरचष्मा झाला होता. अशा वेळी रॉय यांनी त्यांचे चैतन्यशील व्यक्तीत्व व तडजोड न करणारा स्वातंत्रवाद यांच्या योगाने आपल्या देशाच्या सर्जनशिलतेचे महत्व जाणले आणि त्याला सत्वाची ओळख करून देण्याचा कष्टप्रद मार्ग स्विकारला.''

यावरून राजा राममोहन रॉय यांच्या सामाजिक सुधारणेचे महत्व कळून येते.

संदर्भग्रंथ :–

(1) आधुनिक भारत – जावडेकर शं.द.

(2) भारतीय स्वातंत्र्य लढयाचा इतिहास – देवगीरीकर त्र्यं.तू.

(3) भारतीय राजकीय विचारवंत – भोळे डॉ. भास्कर लक्ष्मण

(4) आधुनिक हिंदूस्थानचा इतिहास – पवार डॉ. जयसिंगराव

(5) हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास – पवार डॉ. जयसिंगराव